॥ श्रम ही आराधना ॥

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ) (र.नं.पी.एन.३१७८)


निलेश खरात, अध्यक्ष, मो.: ९८२२४९८३९५
सचिन मेंगाळे, सरचिटणीस, मो.: ९४२२०३७०२९
उमेश आणेराव, कार्याध्यक्ष, मो.: ९९७०००४४७४
राहुल बोडके, संघटन मंत्री, मो.: ९५५२८७४८२१
सागर पवार, कोषाध्यक्ष, मो.: ९८९०१६९६६७


जा. क्र.: एम.व्ही.के.के.एस./एन/2019/24 दिनांक : 24/06/2019

प्रति

मा.ना.देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

मा. ना.चंद्रशेखरजी बावनकुळे
ऊर्जामंत्री
महाराष्ट्र राज्य

मुख्यमंत्री सचिवालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक 25/6/19

मंत्री, नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**विषय : महाराष्ट्रातील वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आझाद मैदान मुंबई येथे शुक्रवार दिनांक 28 जून 2019 रोजी एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन**

संदर्भ:
1) संघटनेचे दिनांक 22/1/2019 चे जावक क्रमांक म.वी.कं.का.सं/एन/2019/22 चे पत्र.
2) दिनांक 27/2/2019 रोजी म.रा.वि.मं सूत्रधारी कंपनीचे कार्यालय एच एस बी सी बिल्डिंग फोर्ड मुंबई येथे संघटनेसोबत माननीय ऊर्जा मंत्री यांच्या समवेत झालेली बैठक.
3) माननीय मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महावितरण यांचे दिनांक 13 मार्च 2019 रोजी चे जावक क्रमांक औ.सं.वि./अ/7257 हे संघटनेस प्राप्त झालेले पत्र
4) संघटनेने दिनांक 19/3/2019 रोजीचे जावक क्रमांक म.वी.कं.का.सं/मुंबई/2019/169/अ. चे पत्र
5) दि. 28/5/2019 रोजी माननीय ऊर्जामंत्री यांच्या समवेत मंत्रालयात त्यांच्या दालनात माननीय मेधाताई कुलकर्णी, विधानसभा सदस्य कोथरुड,पुणे. आणि माननीय प्रकाश आबिटकर,विधानसभा सदस्य,राधानगरी कोल्हापूर तसेच संघटना पदाधिकारी यांच्या समवेत झालेली बैठक
6) दि.11 जून 2019 रोजी चे जावक क्रमांक म.वी.कं.का.सं/मंत्रालय/किमान वेतन/2019/388 अ. मा. मुख्यमंत्री, मा.ऊर्जामंत्री, मा.कामगार मंत्री, या महोदयांना दिलेली पत्र

माननीय महोदय,

वरील संदर्भीय पत्राअन्वये महाराष्ट्रातील ऊर्जा विभागातील तीनही वीज कंपन्यांमधील रिक्त पदांच्या जागेवर नियमित कर्मचाऱ्यांच्या प्रमाणेच फक्त कंत्राटी पद्धतीवर किमान वेतनावर गेली अनेक वर्षे हजारो कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. मागील साडे चार वर्षांमध्ये कामगारांच्या विविध जिव्हाळ्याच्या प्रश्नांबाबत शासन व प्रशासन पातळीवर चर्चा आणि पाठपुरावा आपल्याशी झालेला आहे. कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदुर संघाने विविध पातळीवर सनदशीर मार्गाने अनेक आंदोलने केलेली आहेत. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मा.ऊर्जा मंत्री, मा. कामगार मंत्री

आणि तीनही वीज कंपनीतील वरिष्ठ संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्यासमवेत अनेकदा चर्चा व वाटाघाटी होऊन कामगारांचे प्रश्न सोडवणुकीसाठी आपण वेळोवेळी वीज कंत्राटी कामगारांच्या बाबत जे अनेक सकारात्मक निर्णय जाहीर केले होते. यामध्ये रोजंदारी कामगार पद्धतीवर या कामगारांना कामावर घेण्याबाबत नियुक्त केलेली माननीय मनोज रानडे समिती, तसेच या वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांना समान काम समान वेतन देणे बाबत माननीय अनुराधा भाटिया यांची नियुक्त केलेली समिती, तसेच कंत्राटदार बदलला तरी वीज उद्योगात वर्षानुवर्षे काम करून जनतेला अल्पवेतनात सेवा देत असलेल्या कंत्राटी कामगारांना त्यांच्या वयाच्या 58 वर्षापर्यंत रोजगार दिला जाईल. त्यांची कंत्राटी पध्दती वरील नोकरी पूर्ण झाल्यानंतर 10 लाख रुपये एवढी रक्कम जी कामगारांच्या भविष्यासाठी उपयोगी पडेल तीची तरतूद केली जाईल. वीज उद्योग अत्यंत घातक असा उद्योग असल्याने कंत्राटी कामगार व त्याचे स्वास्थ्य आणि त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्याच्या दृष्टिकोनातून मेडिक्लेम पॉलिसी व अपघात विमा पॉलिसी दिली जाईल. असे अनेक सकारात्मक निर्णय मागील साडेचार वर्षात घेतले गेलेले होते, मा. संजीवकुमार व्यवस्थापकीय संचालक महावितरण यांनी देखील या कामगारांच्या समस्या सोडवणे व पगारवाढीबाबत आश्वासित केले होते. परंतु याबाबत कोणत्याही आश्वासनांची पूर्तता न झाल्यामुळे या घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी तसेच टोस कृती कार्यक्रम राबवला न गेल्यामुळे राज्यातील तिन्ही कंपनीतील कंत्राटी कामगारांना माननीय ऊर्जामंत्री यांनी शासन पातळीवर घेतलेल्या सकारात्मक निर्णयांचा लाभ वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांना आजपर्यंत झालेला नाही हे कामगारांचे दुर्दैव आहे, अत्यंत धोकादायक अशा वीज उद्योगात कंत्राटी कामगारांना फक्त किमान वेतनानुसार कागदोपत्री वेतन मिळत आहे. प्रत्यक्षात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कंत्राटदारांनी या कामगारांच्या माना पिरगाळून त्यांच्या कडून दरमहा 500 ते 3500 रुपये इतकी बेकायदा रक्कम खंडणी प्रमाणे दर महिन्याला वसुली करण्याचा कार्यक्रम हा जोमात राबवलेला आहे. याकडे देखील आपले लक्ष वेधले व लिखित तक्रार दिलेली असताना सुद्धा आपण दिलेल्या आदेशांचे पालन आपल्या मंत्रालयातील अथवा वीज कंपनी प्रशासनातील कोणत्याच अधिकाऱ्याने गांभीर्याने घेतलेले नाही.

कामगारांना लागू असलेल्या विविध कायद्यांचे पालन देखील या कंत्राटदारांनी आज पर्यंत केलेले नाही व कंत्राटदारांवर अंकुश राहावा म्हणून आपल्या खात्यामार्फत नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी देखील या प्रकरणात संगनमत करून कंत्राटी कामगारांचे लाखो रुपयांचे नुकसान केल्याची उदाहरणे आहेत. किमान वेतन कायदा अंतर्गत 4 वर्षांपूर्वी कामगार विभागाने किमान वेतनात सुधारणा होऊन त्याची अंमलबजावणी कायद्याने करणे बंधनकारक असताना देखील आज सुमारे 30 पेक्षा जास्त उद्योगातील कंत्राटी कामगारांना नवीन सुधारित किमान वेतन शासनाच्या कामगार विभागाकडून अद्याप पर्यंत घोषित झालेले नाही.

या सर्व वरील पार्श्वभूमीवर संदर्भीय पत्रानुसार संघटनेने पुणे ते मुंबई असा पायी मोर्चा काढून ऊर्जा खात्याचा निषेध नोंदवला होता त्या दरम्यान देखील आपण 27 फेब्रुवारी 2019 रोजी बैठक घेतली मात्र त्याची आज 4 महिन्यानंतर देखील ठोस अशी अंमलबजावणी आपल्या खात्यातील अधिकारी करू शकले नाहीत हे अत्यंत दुर्दैव आहे. महाराष्ट्र शासन हे लोक कल्याणकारी शासन असून कंत्राटी कामगारांच्या भावना अत्यंत तीव्र असताना वीज उद्योगातील अधिकारी मात्र कंत्राटदारांशी आर्थिक संगनमत करत असताना वीज कंत्राटी कामगार मात्र वीज उद्योगातील कायम कामगारांच्या खांद्याला खांदा देऊन थंडी ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता काम करत आहेत. केवळ किमान वेतनावर काम करून महाराष्ट्र शासनाचे करोडो रुपये वाचवत असताना त्यांच्या तोंडाला अशाप्रकारे पाने पुसणे अथवा फक्त त्यांच्यावर आश्वासनांचो खैरात करणे

हे महाराष्ट्र शासनाच्या दृष्टीकोनातून कदापी योग्य होणार नाही.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आपण राज्यातील कंत्राटी कामगारांच्या बाबत अत्यंत सकारात्मक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम आपण वीज कंपनीतील ज्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते ते आश्वासन विहित वेळेत पूर्ण करण्यात अधिकाऱ्यांना अपयश आले आहे.

अशा संबंधित अधिकाऱ्यांच्या निषेधार्थ महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाच्या वतीने शुक्रवार दिनांक 28 जून 2019 रोजी मुंबई येथील आझाद मैदान येथे सकाळी 9 वाजल्यापासून एक दिवस धरणे आंदोलन करणार आहोत तरी याची आपण व आपल्या खात्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य अशी नोंद घ्यावी आणि कृपया लवकरात लवकर खाली दिलेल्या मागण्यांची पूर्तता करून वीज कंत्राटी कामगारांच्या बाबत योग्य निर्णय घेऊन न्याय द्यावा.

**● संघटनेच्या प्रमुख मागण्या ●**

1) आपण घेतलेल्या सकारात्मक निर्णयांची अंमलबजावणी व ठोस कृती कार्यक्रम येत्या विधानसभेच्या आचारसंहिता लागू होण्यापूर्वी करण्याचे आपल्या स्वाक्षरीचे लेखी आदेश देऊन त्याची प्रत संघटनेकडे द्यावी.

2) 27 फेब्रुवारी 2019 रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्तांतात 28 मे 2019 रोजी मंत्रालयात ठरल्याप्रमाणे बदल करून त्यात आपण दिलेल्या आश्वासनांची त्वरित पूर्तता व्हावी.

3) या पूर्वी आपण दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाच्यावतीने कडक कारवाई व्हावी.

4) कंत्राटदारांच्या आर्थिक विळख्यातून वीज कंत्राटी कामगारांना कायम स्वरूपी मुक्त करावे.

5) कंत्राटदारांच्या मनमानी कारभारामुळे आणि क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व व कंत्राटदार यांच्या संगनमतामुळे राज्यातील अनेक कामगारांकडून कंत्राटी पद्धतीवर कामावर लागण्यासाठी रुपये 5,000 ते 13,000 रुपये घेतलेल्या रकमा कामगारांना कंत्राट दारांकडून परत मिळाव्यात.

6) दरमहा द्यावी लागणारी खंडणीची प्रथा कायमस्वरूपी बंद व्हावी.

7) मा. संजीवकुमार व्यवस्थापकीय संचालक महावितरण यांनी देखील या कामगारांच्या समस्या सोडवणे व पगारवाढीबाबत फेअर वेज पॉलिसी बाबत आश्वासित केले होते त्याची अंमलबजावणी व्हावी

8) तसेच हे पैसे देऊ न शकल्याने जे जूने व अनुभवी कामगार कंत्राटदारांच्या आर्थिक अन्यायामुळे रोजगारापासून वंचित झाले आहेत अशा सर्व कंत्राटी कामगारांना पुन्हा कामावर घ्यावे.

9) खंडणीबहाद्दर कंत्राटदारांवर कायदेशीर कारवाई व्हावी.

10) कंत्राटी कामगारांचे भविष्य निर्वाह निधीचे पैसे जे वीज कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये भरण्यासाठी शासनाच्यावतीने दिले होते त्याचा भरणा शासकीय कोषागारात न भरणाऱ्या कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे तेथील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी दाखल करण्याचे आदेश द्यावेत.

वरील सर्व मागण्यांची पूर्तता आपणाकडून संघास अपेक्षित आहे.

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ
नोंदणी क्र.
पी.एन./३९७८

आपला

निलेश खरात

अध्यक्ष - महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

**पुढील कार्यवाहीसाठी प्रत रवाना**

१. मा. ना. संजयजी कुटे, कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. ना. मदनजी येरावार, राज्यमंत्री उर्जा, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मा. ना. बाळासाहेब भेगडे, राज्यमंत्री कामगार, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. मा. प्रा. सौ. मेधाताई कुलकर्णी कोथरुड, पुणे विधानसभा सदस्या
५. मा. श्री. प्रकाश आबिटकर, राधानगरी, कोल्हापूर विधानसभा सदस्य
६. मा. प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा. प्रधान सचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, बांद्रा, मुंबई
९. मा. सहाय्यक कामगार आयुक्त,.......................... जिल्हा
१०. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधारी कंपनी, मर्यादित, मुंबई
११. मा. व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती मुंबई
१२. मा. व्यवस्थापकिय संचालक, महापारेषण, मुंबई
१३. मा. व्यवस्थापकिय संचालक, महावितरण, मुंबई
१४. मा. संचालक मानव संसाधन विभाग, महानिर्मिती / महापारेषण / महावितरण
१५. मा. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण / महावितरण
१६. मा. अधिक्षक अभियंता,............................ विभाग महानिर्मिती / महापारेषण / महावितरण
१७. मा. चंद्रकांतजी धुमाळ अध्यक्ष, भारतीय मजदुर संघ, महाराष्ट्र प्रदेश
१८. मा. रवींद्रजी देशपांडे सरचिटणीस, भारतीय मजदुर संघ, महाराष्ट्र प्रदेश
१९. मा. जयप्रकाशजी होळीकर अध्यक्ष, महाराष्ट्र वीज कामागर महासंघ,
२०. मा. शंकरराव पहाडे, सरचिटणीस, महाराष्ट्र वीज कामागर महासंघ,
२१. मा. अण्णाजी देसाई, ज्येष्ठ मार्गदर्शक तथा कंत्राटी कामगार समिति सदस्य
२२. मा. शरद संत, ज्येष्ठ मार्गदर्शक तथा कंत्राटी कामगार समिति सदस्य
२३. मा. वेंद्रीय कार्यकारीणी समिती सदस्य, महाराष्ट्र प्रदेश
२४. मा. वरीष्ठ पोलिस निरीक्षक आझाद मैदान, मुंबई.

MSEB HOLDING COMPANY LTD. MUMBAI

EXECUTIVE DIRECTOR HR

Central Registry Unit Received MSETCL Prakashgad, Bandra (E), Mumbai-51.

Chairman & Managing Director RECEIVED MAHAGENCO